दैनिक

# प्रवक्ता लोकशाहीचा

PRAVAKTA LOKSHAHICHA

मुख्य संपादक - नितीन रावण मुजमुले, मो.नं.९६७३२१०४३८ **Email :-** pravaktalokshahicha@gmail.com **Web :-** https://pravaktalokshahicha.com

■ बीड (महाराष्ट्र) ■ दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०१ ■ अंक - १२० ■ शुक्रवार दि. ९ जानेवारी २०२६ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२५/ए२३६९ ■ किंमत २ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily ■ Marathi ■ Year - 01 ■ Issue - 120 ■ Friday Dt. 9 January 2026 ■ RNI : MAHMAR/25/A2369 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

# महापालिकेनंतर जिल्हा परिषद, पंचायत समितीची रणधुमाळी फेब्रुवारीत

## झेडपी निवडणुकांना विलंब? फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात मतदानाची शक्यता



**बीड । प्रतिनिधी**

राज्यात सध्या महानगरपालिका निवडणुकांची धामधूम सुरू असतानाच जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या तारखांकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपूर्वी या निवडणुका घेण्याचे आदेश दिले असले, तरी जानेवारीचा पहिला आठवडा उलटून गेला तरी राज्य निवडणूक आयोगाकडून अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

झेडपी निवडणुकांबाबत महत्त्वाची माहिती समोर येत असून, या निवडणुका फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात घेण्याची परवानगी देण्याची विनंती निवडणूक आयोग सर्वोच्च न्यायालयाकडे करणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे येत्या १८ तारखेपर्यंत जिल्हा परिषद निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार या निवडणुका दोन टप्प्यांत घेण्याचा विचार सुरू आहे.

महानगरपालिकांच्या निवडणुका सुरू असल्याने प्रशासनावर मोठा ताण आहे. मनुष्यबळ, कायदा व सुव्यवस्था आणि मतमोजणीची जबाबदारी लक्षात घेता, तात्काळ जिल्हा परिषद निवडणुका घेणे कठीण ठरत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे न्यायालयाने दिलेल्या मुदतीत निवडणुका घेणे शक्य नसल्याने त्या पुढे ढकलण्याची भूमिका आयोग घेण्याची शक्यता आहे.

> महापालिका निवडणुका आटोपल्यानंतर तात्काळ झेडपी निवडणुका घेता येतील का, याबाबत अधिकाऱ्यांकडून अभिप्राय घेतला जाणार आहे.

> सर्वोच्च न्यायालयात विनंती अर्ज सादर करताना राज्य निवडणूक आयोगाला जिल्हा परिषद निवडणुकांचे संपूर्ण वेळापत्रक निश्चित करूनच सादर करावे लागणार आहे. त्या दृष्टीने आयोगाने तयारी सुरू केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

### प्रशासकीय बैठक

या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने आज प्रशासकीय बैठक बोलावली आहे. या बैठकीत महापालिकांच्या मतमोजणीदरम्यानची परिस्थिती, संभाव्य कायदा-सुव्यवस्था प्रश्न तसेच जिल्हा परिषद निवडणुकांच्या संभाव्य तारखांवर चर्चा होणार आहे.



# विरोधी पक्षाच्या प्रतोदांचा मंत्री पदाचा दर्जा सरकारने काढून घेतला

## आता प्रतोद पदासाठी संख्याबळाची अट; सरकारची हुकूमशाही सुरूच

**मुंबई । प्रतिनिधी**

दहा टक्के सदस्य संख्येचा निकष दाखवून विधानसभा आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेत्याचे पद सत्ताधाऱ्यांनी रिक्त ठेवले आहे, पण आता दहा टक्के सदस्य संख्याबळाचा नियम लावत विरोधी पक्षाच्या प्रतोदांना मिळणारा मंत्रीपदाचा दर्जा आणि इतर सुविधाही सरकारने काढून घेतल्या आहेत. त्यामुळे महायुती सरकारच्या हुकूमशाहीचे आणखीन एक उदाहरण पुढे आल्याचे सांगण्यात येते.



सत्ताधारी पक्षांच्या व्यतिरिक्त ज्या पक्षांच्या विधानसभा आणि विधान परिषदेतील एकूण सदस्य संख्येच्या १० टक्के सदस्य असतील त्यांनाच मंत्रीपदाचा दर्जा आणि विविध सुविधा मिळतील, अशी अट राज्याच्या संसदीय कार्य विभागाने टाकली आहे. निवडणुकीच्या प्रचाराच्या धामधुमीत सरकारने हा निर्णय घेऊन टाकला आहे. फेब्रुवारीत मुंबईत होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात याचे पडसाद उमटण्याची शक्यता आहे. राज्यात नोव्हेंबर २०२४ मध्ये पंधरावी विधानसभा स्थापन झाल्यापासून विधानसभेत विरोधी पक्षनेता नाही. महाविकास आघाडीकडे विधानसभा सदस्य संख्येच्या १० टक्के आमदार नसल्याचे कारण पुढे करीत सत्ताधाऱ्यांनी विधानसभेत विरोधी पक्षनेत्याची मागणी मान्य केलेली नाही. मागील ऑगस्टमध्ये अंबादास दानवे यांची मुदत संपल्याने विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते पद रिक्त आहे. काँग्रेसच्या प्रज्ञा सातव यांच्या राजीनाम्यामुळे काँग्रेसचे विधान परिषदेतील संख्याबळ घटले आहे.

या पार्श्वभूमीवर आता संसदीय कार्य विभागाने मुख्य प्रतोद आणि प्रतोद यांच्या सुविधांच्या संदर्भात नवा शासन निर्णय जारी केला. विधानसभा आणि विधान परिषदेत प्रत्येक पक्षाचा एक मुख्य प्रतोद आणि एक प्रतोद असतो. मुख्य प्रतोदना कॅबिनेट, तर प्रतोदांना राज्यमंत्रिपदाचा दर्जा देण्याचा निर्णय २०१७ साली घेण्यात आला होता. त्याचबरोबर मुख्य प्रतोदांना २५ हजार, तर प्रतोदांना २० हजार रुपये प्रतिमाह मानधन, मुंबईतील अधिवेशनासाठी अनुक्रमे २५ हजार आणि २० हजार वाहन भत्ता, तसेच नागपूर अधिवेशनात वाहन व्यवस्था दिली जाते. मात्र आता विरोधातील कोणत्याही पक्षाकडे विधानसभा आणि विधान परिषदेत १० टक्के संख्याबळ नसल्याने त्यांच्या प्रतोदांना या सुविधा मिळणार नाहीत.

### अशी असते जबाबदारी

विधिमंडळ पक्षाच्या सदस्यांना पक्षादेश जारी (व्हिप) करण्याचा अधिकार. विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्षात दुवा साधण्याचे काम. पक्षाची राजकीय भूमिका आमदारांपर्यंत पोहचवणे.

# नराधम बापास ७ वर्षांचा सश्रम कारावास

## शिरूर कासार पोलिसांची संवेदनशील व शिस्तबद्ध तपासाची यशोगाथा

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

पोलीस स्टेशन येथे दाखल गु.र.नं. १४७/२०२४ या अत्यंत संवेदनशील पोक्सो प्रकरणात शिरूर कासार पोलिसांनी केलेल्या अभ्यासपूर्ण, शिस्तबद्ध व मानवी दृष्टिकोनातून केलेल्या तपासामुळे आरोपीस कठोर शिक्षा सुनावण्यात आली आहे.

दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर तिच्याच वडिलांकडून वारंवार शारीरिक मारहाण व लैंगिक अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली. पीडितेने दिनांक १८ ऑगस्ट २०२४ रोजी धैर्याने शिरूर कासार पोलीस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ७४, ७५, ७६, ११५ तसेच पोक्सो अधिनियम २०१२ अंतर्गत कलम १० व १२ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली. तपासादरम्यान पीडितेचा सविस्तर व विश्वासार्ह जबाब, साक्षीदारांचे जबाब, तसेच आवश्यक महत्त्वाचे पुरावे तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी गोळा करून त्याची योग्य मांडणी करून दोषारोपपत्र वेळेत व भक्कम पुराव्यानिशी सादर करण्यात आले.

सदर खटला मा. न्यायमुर्ती एस.एस. घोरपडे विशेष सत्र न्यायालय, बीड यांचे न्यायालयात चालला. मा. न्यायालयाने पुराव्यांचा सखोल विचार करून आरोपीस दोषी ठरवले. नराधम आरोपीस पोक्सो कलम १० अंतर्गत ७ वर्षे सक्तमजुरी, पोक्सो कलम १२ अंतर्गत ३ वर्षे सक्तमजुरी, बीएनएस कलम ११५ अंतर्गत ६ महिने शिक्षा, आर्थीक दंड व पीडितेला भरपाई अशी शिक्षा सुनावली आहे. सदर गुन्ह्याचा तपास वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी केला तर सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री. ए. बी. तिडके यांनी जोरदार युक्तीवाद केला आहे. तसेच पैरवी अधिकारी म्हणुन श्रेणी पोलीस उपनिरीक्षक गोविंद सानप यांनी कामकाज पाहीले आहे.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण करून बलात्कार प्रकरणी गुन्हा दाखल

**केज । लोकदिशा न्यूज**

ट्युशनला जात असलेल्या एका अल्पवयीन मुलीला कार मधून अपहरण करून तिच्यावर तिच्यावर बळजबरीने बलात्कार केल्या प्रकरणी केज पोलिस ठाण्यात उशिरा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

केज तालुक्यातील एका गावात राहत असलेली साडे पंधरा वर्ष वयाची एक अल्पवयीन मुलीची धीरज सांजुरे याच्याशी ओळख झाली. त्या ओळखीचा गैरफायदा धीरज सांजुरे याने घेण्याच्या उद्देशाने दि. ६ जानेवारी रोजी धीरज सांजुरे याने त्या अल्पवयीन मुलीला फिरायला जाण्याचे आमिष दाखविले. त्या नंतर सकाळी ती अल्पवयीन मुलगी केज येथे ट्युशनला जाण्यासाठी केज येथे आली असता सकाळी ९:३० च्या सुमारास धीरज सांजुरे त्या अल्पवयीन मुलीचे एका कार मधून अपहरण करून तिला धारूर तालुक्यातील अंबाचोंडी येथील डोंगरात घेऊन गेला. तिथे गेल्या नंतर एका निर्जनस्थळी कोणी नसल्याचा गैरफायदा घेत त्याने अल्पवयीन मुलीच्या इच्छेविरुद्ध बळजबरीने तिच्यावर बलात्कार केला.

त्या नंतर त्या पीडित अल्पवयीन मुलीने ही माहिती तिच्या पालकांना दिल्या नंतर पालकांनी पीडित मुलीसह केज पोलिस ठाणे गाठून या घटनेची माहिती पोलिस अधिकाऱ्यांना दिली. या प्रकरणी केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. ०९/२०२६ भा. न्या. सं. ६५(१), ६४(२)(एम), ८७, १३७(२) आणि पोक्सो कायद्याच्या कलम ४, ६ प्रमाणे रात्री उशिरा गुन्हा करण्यात आला आहे. याचा तपास पिंक पथकाचे पोलिस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे करीत आहेत.

# जबरी चोरीतील आरोपींच्या ४८ तासात आवळल्या मुसक्या

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील सराटेवडगाव येथील शेळके वस्तीवर ४ जानेवारीच्या मध्यरात्री झालेल्या जबरी चोरीच्या घटनेचा अंभोरा पोलिसांनी यशस्वी छडा लावला आहे. १७ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या पथकाने १५० किलोमीटरची शोधमोहीम राबवून, चोरीतील दोन सख्ख्या भावांना त्यांच्या घरातून अटक केली. अक्षय गारमन चव्हाण (२३) आणि रिजवान गारमन चव्हाण (२०, रा. शेरी बुद्रुक) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे असून गुन्हेगारीतून झटपट श्रीमंत होण्यासाठी सख्ख्या भावांनी दरोड्याचा रस्ता निवडल्याचे समोर आले आहे.

सराटेवडगाव येथे ग्यानबा राजपुरे यांच्या घराचा दरवाजा तोडून चोरट्यांनी मारहाण करत दागिने आणि रोकड लंपास केली होती. सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी तातडीने तपासचक्र फिरवून सीसीटीव्ही आणि तांत्रिक विश्लेषण केले. चोरटे आष्टी तालुक्यातील शेरी येथील असल्याची खात्री पटताच, मंगळवारी पहाटे पोलिसांनी आरोपींच्या घराला वेढा घातला. आरोपी गाढ झोपेत असतानाच पोलिसांनी त्यांच्या दारात उभे राहून मुसक्या आवळल्या.

# गौण खनिज घोटाळ्यातील चौकशी वळवण्याचा प्रयत्न?

## निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांचे पत्र वादात : अशोक कातखडे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गौण खनिज प्रकरणात गंभीर भ्रष्टाचार व अनियमिततेचे आरोप पुन्हा एकदा ऐरणीवर आले असून, या प्रकरणातील चौकशी पद्धतीवरच आता मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिल्हा प्रशासनातील काही अधिकाऱ्यांनी चौकशीची दिशा बदलण्याचा व निष्पक्ष तपास टाळण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारकर्त्यांकडून करण्यात आला आहे.

भ्रष्टाचार निर्मूलन समिती, मराठवाडाचे अध्यक्ष अशोक कातखडे यांनी तहसीलदार तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी नरेंद्र कुलकर्णी बीड आणि तहसीलदार सुरेश घोळवे शिरूर (कासार) यांच्याविरोधात गंभीर स्वरूपाची तक्रार विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सादर केली आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्तांनी जिल्हाधिकारी बीड यांना पत्रव्यवहार करून चौकशीचे स्पष्ट आदेश दिले असतानाही, शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी स्तरावरून सदर चौकशी पुन्हा उपविभागीय बीड अधिकाऱ्यांकडे सोपविण्याचा निर्णय घेतल्याने वाद निर्माण झाला आहे.



विशेष बाब म्हणजे, याच उपविभागीय अधिकारी बीड यांची गौण खनिज संबंधित प्रकरणातील पूर्वीची चौकशी ही मा.हरिष धार्मिक साहेब अपर जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत आधीच चौकशी प्रलंबित असल्याने, निष्पक्षतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यामुळे चौकशी ही स्वतःच्याच यंत्रणेकडून स्वतःची तपासणी अशा स्वरूपाची ठरत असल्याचा आरोप तक्रारकर्त्यांनी केला आहे. बीड जिल्ह्यातील गौण खनिज मधील भ्रष्टाचार व अनिमियता बाहेर येऊ नये म्हणून संगनमताने जाणिवपुर्वक असद्भावनेतून हा सर्व प्रकार करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर, संबंधित शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांचे पत्र तत्काळ रद्द करून मा.विभागीय आयुक्तांच्या मार्फत स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी समिती गठीत करण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे. तसेच, चौकशी प्रक्रियेत हस्तक्षेप व अधिकारांचा गैरवापर केल्याच्या आरोपांवरून शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगात्मक कारवाईचीही मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणामुळे बीड जिल्ह्यातील गौण खनिज व्यवहार, प्रशासकीय निर्णयप्रक्रिया आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका यावर पुन्हा एकदा संशयाचे सावट निर्माण झाले असून,यासंदर्भात दि.२९/१२/२०२५ रोजी चंद्रशेखर बावनकुळे साहेब महसूल मंत्री, विभागीय आयुक्त छ.संभाजीनगर, जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे रितसीर तक्रार करण्यात आली आहे. यावर काय भूमिका घेतली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बीड जिल्ह्यातील एकच खळबळ उडाली आहे.

# बीडची रेल्वेपेक्षा जत्रेतली रेल्वे बरी

## रेल्वेला गती कधी मिळेल : शेख युनूस





**बीड । प्रतिनिधी**

बीड ते अहिल्यानगर रेल्वेचे उद्घाटन १७ सप्टेंबर २०२५ रोजी झाले. १६६ किलोमीटर रेल्वेचे काम पूर्ण झाले पण या रेल्वेला बीड ते अहिल्यानगर जाण्यासाठी सहा ते सात तासाचा प्रवास करावा लागत आहे. रेल्वेला गती कधी मिळेल? त्यासाठी आत्तापर्यंत १२८६ कोटी खर्च झालेले असून रेल्वे मात्र १७ स्टॉप घेऊन त्यात अजून फाकट उघडण्यासाठी रेल्वेच्या कर्मचाऱ्याला उतरून ते परत लावावे लागत आहे. तर यापेक्षा जत्रेतली रेल्वे बरी असेच म्हणावे लागेल.

चाळीस वर्षाच्या कालावधीनंतर बीडला रेल्वे येवूनही प्रवासाला काहीच उपयोग झालेला नाही. कारण तिथे जाण्यासाठी रिक्षावाले दीडशे ते दोनशे रुपये घेतात. त्यात रेल्वे स्टेशनची काय अवस्था झाली. याकडे पण प्रशासनाचे दुर्लक्ष आहे, असे दिसून येत आहे. कोणी लक्ष देत नाही. नागरिकाकडून बोलले जात आहे की रेल्वे येऊन उपयोग काय? यापेक्षा तर जत्रेतील रेल्वे बरी.

# भाजपाच्या मित्रपक्षांचा तीव्र संताप

भारताच्या सीमेला लागून असलेल्या बांगलादेशात गेल्या महिन्यात प्रचंड हिंसाचार उफाळला. विद्यार्थी नेता शरीफ उस्मान हादी याच्या मृत्यूनंतर राजधानी ढाकामध्ये हिंसक आंदोलने झाली. या आंदोलनादरम्यान तेथील अनेक अल्पसंख्याक हिंदूंना लक्ष्य करण्यात आले. यापार्श्वभूमीवर बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानची आगामी आयपीएल स्पर्धेतून हकालपट्टी करण्यात आली. शाहरुख खानच्या कोलकाता नाईट रायडर्स संघाने घेतलेल्या या निर्णयावर भाजपाच्या मित्रपक्षांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. जनता दल (युनायटेड) आणि तेलगू देसम पार्टीच्या नेत्यांनी या प्रकरणावरून बीसीसीआयवर टीकेची झोड उठवली आहे. भारत व बांगलादेशातील संबंधात आणखीनच दुरावा निर्माण होईल असे निर्णय टाळायला हवे होते, असे खुद्द एका भाजपाच्याच नेत्याने मान्य केले आहे. गेल्या काही आठवड्यांपासून भारत आणि बांगलादेश यांच्यातील द्विपक्षीय संबंधांमध्ये तणाव निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. बांगलादेशात ईशानिंदेच्या आरोपावरून एका हिंदू व्यक्तीची जमावाने हत्या करून त्याला जाळण्यात आल्याची घटना घडल्यानंतर हा तणाव अधिक तीव्र झाला आहे. गेल्या महिन्यात भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने बांगलादेशातील अल्पसंख्याकांवर सातत्याने हल्ले होत असल्याने तीव्र शब्दांत निषेध केला होता. याच पार्श्वभूमीवर मुस्तफिजुरला संघातून बाहेर करण्याचा निर्णय आल्याने त्याला राजकीय दृष्टिकोनातून पाहिले जात आहे. मुस्तफिझूर रहमानला आयपीएलमधून डच्चू दिल्यानंतर निर्माण झालेला वाद आता अधिक गडद झाला आहे. जेडीयू आणि टीडीपी यांसारख्या भाजपाच्या मित्रपक्षांनी या मुद्द्यावर उघडपणे आपली मते मांडली आहेत. सध्याच्या परिस्थितीत भारत आणि बांगलादेश यांच्यातील क्रिकेट संबंध शक्य नसल्याचे आम्हाला समजते. मात्र, तरीही क्रिकेटला राजकारणापासून दूर ठेवता आले असते, असे मत जेडीयूचे सल्लागार के.सी. त्यागी यांनी मंगळवारी दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना व्यक्त केले. तेलुगू देशम पार्टीचे (ढउ्झ) नेते लावू श्रीकृष्ण देवरायलू यांनीही भारत-बांगलादेश संबंध अधिक बिघडवण्याऐवजी ते सुधारण्याचे प्रयत्न व्हायला हवेत, असे सांगितले. दोन्ही देशांमध्ये यापूर्वी अत्यंत चांगले संबंध होते. सध्या काही तणाव निर्माण झाला असला तरी तो कमी करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. व्यापार, क्रीडा यांसारख्या अनेक क्षेत्रांत सहकार्याच्या संधी उपलब्ध आहे, असा सल्लाही देवरायलू यांनी दिला आहे. भाजपा आणि सरकारमधील काही सूत्रांच्या मते, आधीच तणावाखाली असलेल्या भारत-बांगलादेश संबंधांना अधिक धक्का देणारे निर्णय टाळायला हवे होते. भाजपाच्या एका ज्येष्ठ नेत्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यातील फरक आपण ओळखायला हवा. शेजारील राष्ट्रांसोबत तणाव वाढवणारी कोणतीही कृती टाळता आली असती. यादरम्यान मुस्तफिझूर रहमानची आयपीएलमधून हकालपट्टी झाल्यानंतर बांगलादेशच्या क्रिकेट संघानेही २०२६ टी-२० विश्वचषकासाठी भारतात येण्यास नकार दिला होता. सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. बांगलादेशने विश्वचषकासाठी भारतात पंच (अंपायर) न पाठवण्याचाही निर्णय घेतला. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे (आयसीसी) औपचारिक मागणी करून भारतातील आपले सामने श्रीलंकेत हलवण्याची विनंती केली होती. परंतु त्यांची ही मागणी आयसीसीने धुडकावून लावली आहे. त्यामुळे बांगलादेशी खेळाडूंना विश्वचषकाचे सामने भारतात खेळावे लागणार आहे. बांगलादेशातील हिंदूवर होणाऱ्या हल्ल्यांमुळे धार्मिक नेत्यांच्या दबावाखाली केकेआरने मुस्तफिझूर रहमानला संघातून काढून टाकल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणावर जेडीयूचे सल्लागार के. सी. त्यागी यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. शाहरुख खान (केकेआरचे सह-मालक) याच्याविरोधात फतवा काढणारे हे धार्मिक उपदेशक नेमके कोण आहेत? हा प्रकार स्पष्टपणे धार्मिक पक्षपात दर्शवतो. केकेआरमधील ४५ टक्के भागीदारी असलेल्या अभिनेत्री जुही चावला आणि त्यांचे उद्योगपती पती जय मेहता यांच्यावर टीका करण्याचे धैर्य त्यांनी का दाखवले नाही? असा प्रश्न त्यागी यांनी उपस्थित केला आहे. मी जेडीयूचा नेता म्हणून नव्हे तर एक सजग नागरिक म्हणून ही भूमिका मांडत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यागी यांच्या विधानानंतर जेडीयूचे राष्ट्रीय प्रवक्ते राजीव रंजन प्रसाद यांनी पक्षाची बाजू सावरून धरली आहे. बीसीसीआय आणि केकेआरने घेतलेला निर्णय हा हिंदू अल्पसंख्याकांवरील अत्याचारांच्या मालिकेला दिलेली प्रतिक्रिया आहे. मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकार कट्टरपंथीयांना रोखण्यात अपयशी ठरले आहे. केकेआरच्या निर्णयाला पक्षातील काही नेत्यांचा पाठिंबा असल्याचे राजीव प्रसाद यांनी स्पष्ट केले आहे. जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनीही या वादात उडी घेतली आहे. एका खेळाडूला बाहेर काढल्याने बांगलादेशातील परिस्थिती सुधारेल का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. बीसीसीआयच्या या निर्णयामुळे शेजारील देशातील अल्पसंख्याकांच्या परिस्थितीत सुधारणा होण्याऐवजी परस्पर अविश्वास अधिक वाढेल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे. पाकिस्तानबरोबरचे आपले संबंध खराब असल्याचे मला मान्य आहे, पण बांगलादेशने भारतात कधीच दहशतवाद पसरवलेला नाही. त्यांच्याशी पूर्वीपासूनच आपले संबंध चांगले राहिलेले आहेत. सध्या तेथील हिंदूवर होत असलेल्या हल्ल्यांमध्ये मुस्तफिझूर रहमानची काय चूक आहे? असा प्रश्न त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना उपस्थित केला आहे.

# चीनचा धूर्तपणा पुन्हा उघड; पँगॉन्ग सरोवराजवळ सैन्याच्या घुसखोरीसाठी बांधकाम?

चीनमधील टियांजिन येथे झालेल्या २०२५ च्या शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेतली. मात्र, आता नवीन हाय-रिझोल्यूशन सॅटेलाइट इमेजरीवरून असे दिसून आले आहे की, पूर्व लडाखमधील वादग्रस्त पँगॉन्ग त्सो सरोवराजवळ चीन आपली लष्करी तैनाती वाढवत आहे.

अमेरिकेने भारतावर टॅरिफ लादल्यानंतर चीन आणि भारत यांच्यातील द्विपक्षीय संबंध सुधारताना दिसत आहेत. सीमेवरील तणाव कमी करण्यासाठी दोन्ही देशाकडून पावलं उचलली जात आहेत. चीनमधील टियांजिन येथे झालेल्या २०२५ च्या शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेतली. मात्र, आता नवीन हाय-रिझोल्यूशन सॅटेलाइट इमेजरी (उपग्रह छायाचित्रे) वरून असे दिसून आले आहे की, पूर्व लडाखमधील वादग्रस्त पँगॉन्ग त्सो सरोवराजवळ चीन आपली लष्करी तैनाती वाढवत आहे. सॅटेलाइट छायाचित्रांवरून काय समोर आले? भारताला याचा धोका काय?

**पँगॉन्ग त्सो सरोवरातील छायाचित्रे काय दर्शवतात?**

४ जानेवारी रोजी भू-राजकीय तज्ज्ञ डॅमियन सायमन यांनी पँगॉन्ग त्सो सरोवरा जवळील एक नवीन उपग्रह छायाचित्र पोस्ट केले. यामध्ये चीन लडाख सीमेजवळील बफर झोनजवळ कायमस्वरूपी बांधकाम करत असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. हे बांधकाम चीनच्या ताब्यात असलेल्या प्रदेशात आहे, तरी ते पँगॉन्ग त्सोच्या अत्यंत जवळ आहेत. सायमन यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले की, चीन पँगॉन्ग त्सो येथील भारताबरोबरच्या लष्करी बफर झोनजवळ नवीन इमारती बांधत आहे. हे चीनच्या ताब्यात असलेल्या भूभागात घडत असले तरी, यामुळे २०२० च्या सीमा वादानंतर चीनच्या भौतिक उपस्थितीला बळकटी मिळते.

चीन याठिकाणी नक्की कोणते बांधकाम करत आहे, हे सध्या निश्चित नाही. पँगॉन्ग त्सोच्या अगदी जवळ अनेक कायमस्वरूपी इमारतींसह एका संकुलाचे बांधकाम केले जात आहे. हे ठिकाण जेटी आणि सैनिकांच्या



निवासाजवळ असून, बफर झोनच्या पलीकडे असलेल्या पहिल्या पीपल्स लिबरेशन आर्मी (पीएलए) पोस्टच्या जवळ आहे. २०२० पासून सैनिकांच्या निवासासाठी, तसेच तलावातून वाहतुकीसाठी नौका आणि जेटीसाठी चीनने उभारलेल्या तात्पुरत्या बांधकामांव्यतिरिक्त हे कायमस्वरूपी बांधकाम केले जात आहे. या बांधकामामुळे प्रतिकूल हवामानातही वर्षभर मोहिमा सुरू ठेवण्याची चीनची क्षमता वाढते, असेही सायमन म्हणाले.

**वास्तविक नियंत्रण रेषेवर चीन नक्की काय करत आहे?**

२०२० मधील गलवान संघर्षापासून चीन प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (एलएसी) आपल्या लष्करी पायाभूत सुविधा वेगाने वाढवत आहे. गेल्या ऑक्टोबरमध्ये उपग्रह छायाचित्रांमधून तिबेटच्या पँगॉन्ग सरोवराजवळील एका जागेवर चीन एका संकुलाचे बांधकाम करत असल्याचे समोर आले होते. हे ठिकाण २०२० मध्ये भारत आणि चीनच्या सैन्यात संघर्ष झालेल्या ठिकाणाच्या अगदी जवळ आहे. या संकुलात कमांड आणि कंट्रोल इमारती, बॅरेक्स, वाहनांसाठी शेड्स, दारूगोळा साठा आणि रडार यंत्रणांचा समावेश होता.

जुलै २०२४ मध्ये, चीनने पूर्व लडाखमधील पँगॉन्ग त्सोवर एका पुलाचे बांधकाम पूर्ण केले, ज्यामुळे सैन्याच्या हालचाली सोप्या झाल्या आहेत. खुर्नक येथील या बांधकामामुळे चिनी सैन्याची गतिशीलता वाढली आहे आणि एखादी मोहीम राबवण्यासाठी लागणारा वेळ कमी झाला आहे. यामुळे चिनी सैन्याला त्यांच्या टँकसह रेझांग ला सारख्या दक्षिण किनाऱ्यावरील भागात पोहोचण्यास मदत होते. 'द इकॉनॉमिस्ट'च्या वृत्तात असेही नमूद केले आहे की, २०२० पासून चीनच्या कायमस्वरूपी बांधकामांमध्ये दहापट वाढ झाली आहे. याव्यतिरिक्त, चीन आपल्या नागरिकांना सीमेजवळ वसवित आहे. तिथे घरे, वीज आणि दळणवळण सुविधांनी सज्ज गावे उभारली जात आहेत. नवी दिल्लीतील अधिकाऱ्यांच्या निरीक्षानुसार, यामुळे पीपल्स लिबरेशन आर्मीला (पीएलए) त्यांचे सैन्य तैनात ठेवणे आणि हालचाली करणे सोपे जाते. या वसाहतीचे एक मुख्य वैशिष्ट्य म्हणजे तिथे १५० मीटर लांब पट्टी होती, जी हेलिकॉप्टर ऑपरेशन्ससाठी वापरली जाऊ शकते, असे तज्ज्ञांनी ऑक्टोबर २०२४ मध्ये सांगितले आहे. एका भारतीय अधिकाऱ्याने 'द इकॉनॉमिस्ट'ला सांगितले की, मोठ्या बजेटमुळे चीनच्या पायाभूत सुविधा विकासाचा वेग भारताच्या तुलनेत किमान चार पट जास्त आहे.

**भारत-चीन संबंध**

भारत आणि चीन २०२० च्या संघर्षानंतर त्यांचे संबंध सुधारण्याचा प्रयत्न करत असतानाच या गोष्टी समोर येत आहेत. ऑक्टोबर २०२४ मध्ये दोन्ही देशांनी सीमावाद संपवण्यावर सहमती दर्शवली. याचाच एक भाग म्हणून, भारतीय यात्रेकरूंना तिबेटमधील कैलास आणि मानसरोवर यात्रेसाठी परवानगी देण्यात आली. त्यानंतर दोन्ही देशांनी व्हिसा प्रक्रिया सुलभ केली आणि पाच वर्षांनंतर विविध शहरांना जोडणारी विमान सेवा पुन्हा सुरू झाली. नवी दिल्लीतील इन्स्टिट्यूट ऑफ चायनीज स्टडीजच्या मानद संचालक अलका आचार्य यांनी सांगितले की, या घडामोडी चांगल्या संबंधांच्या दिशेने एक स्वागतार्ह पाऊल होत्या.

मात्र, यातही सातत्याने अडचणी येत आहेत. 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान पाकिस्तानने चीन बनावटीच्या शस्त्रास्त्रांचा केलेला वापर हे असेच एक उदाहरण होते. तसेच, शांघाय विमानतळावर चिनी इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी अरुणाचल प्रदेशातील रहिवासी पेम थोंगडोक यांच्याशी केलेली वाईट वागणूकही चर्चेत आहे. थोंगडोक यांनी असा आरोप केला की, २१ नोव्हेंबर रोजी ट्रान्झिट दरम्यान चिनी इमिग्रेशनने त्यांना १८ तास ताब्यात ठेवले आणि त्यांचे जन्मस्थान अरुणाचल प्रदेश असल्याने त्यांचा भारतीय पासपोर्ट स्वीकारण्यास नकार दिला.

एकूणच, पँगॉन्ग सरोवराभोवती कायमस्वरूपी बांधकामे होणे हे सूचित करते की परिस्थिती दिसते तितकी सामान्य नाही. अमेरिकेने आपल्या एका अहवालात म्हटल्याप्रमाणे, चीन भारताबरोबरचा सीमा तणाव कमी करून त्याचा फायदा घेऊ इच्छित आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध अधिक दृढ होण्यास अडथळा निर्माण करणे, हे त्यांचे उद्दिष्ट आहे, असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

# कल्याण-लातूर जनकल्याण महामार्गही वादात? मराठवाड्यातील दोन जिल्हे आमने-सामने?

समृद्धी महामार्ग असो वा शक्तिपीठ महामार्ग वा इतर कोणतेही रस्ते प्रकल्प, नवीन रस्ते प्रकल्प जाहीर झाल्यानंतर त्या प्रकल्पास स्थानिकांकडून, जमीन मालकांकडून तीव्र विरोध होतो. प्रकल्प रद्द करण्याची मागणी होते आणि प्रकल्प वादात अडकतो. या प्रमाणे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचा (एमएसआरडीसी) प्रस्तावित कल्याण-लातूर जनकल्याण महामार्गही वादात अडकला आहे. हा महामार्ग आपल्या जिल्ह्यातून नेण्यास कोणाचीही विरोध नाही, प्रकल्प रद्द करण्याची कोणाचीही मागणी नाही. मात्र तरीही हा प्रकल्प वादात अडकला आहे. हा वाद नेमका काय आहे आणि जनकल्याण महामार्ग नेमका कसा आहे याचा हा आढावा

**कल्याण ते लातूर महामार्गाची गरज का?**

मराठवाड्यातील एक महत्त्वाचा जिल्हा म्हणजे लातूर. लातूरला मुंबई, ठाण्यावरून जाण्यासाठी आजच्या घडीला किमान १२ तास लागतात. पुणे-सोलापूर महामार्ग किंवा बार्शी मार्गे जावे लागते. मुंबई, ठाणे ते लातूर प्रवासाचे अंतर बरेच असून हे अंतर कमी करण्यासाठी एमएसआरडीसीने समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर ठाणे ते लातूरदरम्यान द्रुतगती महामार्ग बांधता येईल का याचा विचार सुरू केला. त्यातूनच कल्याण ते लातूर महामार्गाची संकल्पना पुढे आली. त्यानंतर एमएसआरडीसीने आपल्या ४००० किमीहून अधिकच्या रस्ते प्रकल्पात कल्याण ते लातूर द्रुतगती महामार्ग प्रस्तावित केला. हा महामार्ग पुढे लातूर-कर्नाटक सीमेपासून पुढे हैदराबादलाही जाणार आहे. यातून मुंबई ते हैदराबाद असा ५९० किमीचा महामार्ग होईल. मात्र कर्नाटकमधील ६१ किमीच्या मार्गाचे तसेच तेलंगणातील ७९ किमीच्या मार्गाचे काम त्या-त्या राज्यांना करावे लागणार आहे. एमएसआरडीसीकडून



कल्याण ते लातूर अशा ४५० किमीच्या महामार्गाचे काम केले जाणार आहे.

**कसा आहे कल्याण ते लातूर महामार्ग?**

कल्याण ते लातूर महामार्गास एमएसआरडीसीकडून जनकल्याण महामार्ग असे नाव देण्यात आले आहे. या महामार्गामुळे मराठवड्याचा, त्यातही दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लातूरचा सर्वांगीण विकास साधला जात असल्याने या महामार्गास जनकल्याण असे नाव देण्यात आले आहे. ठाणे, पुणे, अहिल्यानगर, बीड, धाराशीव आणि लातूर अशा सहा जिल्ह्यांतून हा महामार्ग जाण्याची शक्यता आहे. सरेखन अंतिम झाल्यानंतरच हा महामार्ग नेमका कसा, कोणत्या जिल्ह्यांतून आणि तालुक्यातून जाणार हे स्पष्ट होईल. या प्रकल्पास अंदाजे ४५ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. हा महामार्ग तयार झाल्यास कल्याण ते लातूर प्रवास १०-१२ तासांऐवजी केवळ ४-५ तासांत करणे शक्य होणार आहे.

महत्त्वाचे म्हणजे हा महामार्ग नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाशी लातूर येथे अंतरबदल मार्गिकेने जोडला जाणार आहे. त्यामुळे शक्तिपीठवरून गोव्याबरोबर मुंबईही गाठता येणार आहे. नागपूर, नांदेड, जालन्यावरून शक्तिपीठने येणाऱ्या वाहनांना लातूर अंतरबदल मार्गिकेने मुंबईलाही जाता येणार आहे. तर ठाण्यात जनकल्याण महामार्ग पुढे विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका आणि अटल सेतूला जोडला जाणार असल्याने मुंबई शहरात आणि मुंबई महानगर प्रदेशातील इतर भागातही पोहचणे सोपे होणार आहे.

**प्रकल्पाची सद्यःस्थिती**

एमएसआरडीसीकडून या प्रकल्पाची घोषणा होऊन दोन वर्षे झाली तरी हा प्रकल्प मार्गी लावण्याच्या दृष्टीने कोणतेही पाऊल आतापर्यंत उचलले गेले नव्हते. मात्र डिसेंबर २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात एमएसआरडीसीने या प्रकल्पाचे सादरीकरण केले आणि हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असल्याचे म्हणत मुख्यमंत्र्यांनी प्रकल्पास हिरवा कंदील दाखवला. हिरवा कंदील मिळाल्यानंतर आता एमएसआरडीसीकडून या प्रकल्पाच्या सरेखनाचे काम सुरू आहे. सरेखन अंतिम झाल्यानंतर आराखडा तयार करत, पुढील कार्यवाही करत प्रकल्प मार्गी लावला जाणार आहे.

**जनकल्याण वादात का?**

कोणताही रस्ते प्रकल्प जाहीर झाल्यानंतर त्या प्रकल्पास विरोध होतोच होतो. त्यामुळेच समृद्धी महामार्गास विरोध झाला होता. तर आता शक्तिपीठ महामार्ग वादात अडकला आहे. कोल्हापूर, सांगली आणि अन्य काही जिल्ह्यांतील स्थानिकांनी, शेतकऱ्यांनी शक्तिपीठला विरोध केला आहे. हा महामार्ग आपापल्या भागातून नेण्यास विरोध करत महामार्गच रद्द करण्याची मागणी केली आहे. अशात आता जनकल्याण महामार्गही वादात अडकला आहे. मात्र वाद काहीसा वेगळाच आहे. कारण या महामार्गाला स्थानिकांचा वा शेतकऱ्यांचा विरोध नाही, हा महामार्ग रद्द करण्याची कुठेही कोणाचीही मागणी नाही. पण प्रकल्प वाद अडकला आहे हे मात्र खरे. हा महामार्ग आमच्या भागातून न्यावा यासाठी वाद सुरू आहे. जनकल्याण महामार्ग सुरुवातीला पाच जिल्ह्यांतून जाईल असे एमएसआरडीसीने जाहीर केले होते. त्यानुसार ठाणे, अहिल्यानगर, पुणे, बीड आणि लातूर या पाच जिल्ह्यांचा यात समावेश होता. आता मात्र हा महामार्ग धाराशीवमधूनही नेला जाण्याची शक्यता आहे. बीड आणि धाराशीववासियांमध्येच या महामार्गावरून वाद सुरू आहे.

**वाद नेमका काय? राजकीय पक्षही मैदानात?**

जनकल्याण महामार्ग बीडमधून जाणार असून मराठवाड्यातील धाराशीवचा मात्र यात समावेश नव्हता. त्यामुळे हा महामार्ग धाराशीवमधून न्यावा अशी मागणी करण्यात आली. तो लातूर-कळंब-पारा-ईट-खर्डा-जामखेड-अहिल्यानगर-कल्याण असा असावा ही मागणी आहे. असा मार्ग नेल्यास त्याचा फायदा धाराशीवच्या विकासासाठी होईल असे म्हणत खासदार ओमप्रकाश निंबाळकर यांनी थेट केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनाच पत्र पाठवले. धाराशीवमधून मार्ग नेल्यास महामार्ग ६०-७० किमीने कमी होईल आणि प्रवासाचे अंतर कमी होईल असेही धाराशीववासियांकडून सांगितले जात आहे. दुसरीकडे बीडवासियांनी मात्र हा महामार्ग बीडमधूनच जावा अशी ठाम भूमिका घेतली आहे. धाराशीवमधून मार्ग नेताना बीडला वगळावे लागणार आहे. त्यामुळे खासदार बजरंग सोनावणे, खासदार रजनी पाटील, आमदार धनंजय मुंडे मैदानात उतरले आहेत. त्यांनी बीडला या महामार्गातून वगळ्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्यांनी पत्रही पाठविले आहे. शक्तिपीठ महामार्ग आमच्या भागातून नेऊ नये, तो रद्द करावा अशी मागणी एकीकडे होत आहे तर दुसरीकडे मात्र जनकल्याण महामार्ग आमच्या भागातूनच न्यावा यासाठी वाद सुरु असल्याचे चित्र आहे.

**सरेखनात मात्र पाचही जिल्हे?**

जनकल्याण धाराशीवमधून न्यावा अशी मागणी असून तसा नेल्यास बीड जिल्ह्यातील भाग वगळला जाणार आहे. त्यामुळे बीडला वगळू नये अशी मागणी आहे. त्यामुळे एक मोठा पेच आता एमएसआरडीसीसमोर निर्माण झाला आहे. सध्या या महामार्गाचे सरेखन तयार करण्याचे काम एमएसआरडीसीकडून सुरू आहे. तर या सरेखनात आता पाचऐवजी सहा जिल्ह्यांचा समावेश करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. धाराशीव जिल्ह्याचा समावेश महामार्गात करण्यात आला आहे. मात्र नेमके सरेखन काय असेल हे अद्याप स्पष्ट नाही. अशात एमएसआरडीसीने मात्र तांत्रिक आणि आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरेल असेच सरेखन अंतिम केले जाईल अशी ठाम भूमिका घेतली आहे. कल्याण ते लातूर प्रवासाचे अंतर ज्या सरेखनामुळे अतिजलद होईल तेच सरेखन निवडले जाईल असेही एमएसआरडीसीकडून सांगितले जात आहे. त्यामुळे हा महामार्ग नेमका कसा जाणार यासाठी सरेखन अंतिम होण्याची वाट पाहावी लागणार आहे. पण यावेळी बीड वा धाराशीव कोणताही जिल्हा वगळला तर यावरून मोठा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

# डोंगरेवाडीच्या स्व.गणेश डोंगरे यांच्या कुटुंबाला शासनाचा मोठा आधार; मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लाखांची मदत जाहीर

**वडवणी । प्रतिनिधी**

तालुक्यातील डोंगरेवाडी येथील रहिवासी गणेश डोंगरे यांचा साखर कारखान्यावर झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झाला होता. या अत्यंत गरिब कुटुंबावर कोसळलेल्या दुःखाची दखल घेत, महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. ६ जानेवारी रोजी डॉ.ओमप्रकाश शेटे (अध्यक्ष आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती, महाराष्ट्र शासन) यांनी डोंगरेवाडी येथे प्रत्यक्ष भेट देऊन ही मदत जाहीर केली.

गणेश डोंगरे हे आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी 'भाऊसाहेब बिराजदार साखर कारखान्यावर' ऊस तोडीसाठी गेले होते. कारखान्याच्या गटामध्ये उसाने भरलेली बैलगाडी उभी असताना एका ट्रॅक्टरने पाठीमागून त्या बैलगाडीला जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, जवळच बसलेल्या गणेश डोंगरे यांच्या अंगावर उसाने भरलेली संपूर्ण बैलगाडी उलटली. या दुर्दैवी अपघातात गणेश डोंगरे यांचा जागीच मृत्यू झाला.

**भाजपा युवा मोर्चा आणि सरपंच मयूर आंधळे यांचा पुढाकार**

या घटनेनंतर डोंगरे कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना मदतीची नितांत गरज होती. ही बाब लक्षात घेऊन भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे आणि रुई गावाचे सरपंच मयूर आंधळे यांनी तातडीने सूत्रे हलवली. त्यांनी महाराष्ट्र



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याशी संपर्क साधून या कुटुंबाला जास्तीत जास्त शासकीय मदत मिळवून देण्यासाठी विशेष पाठपुरावा केला.

**मुख्यमंत्र्यांकडून तत्काळ दखल**

संजय आंधळे आणि मयूर आंधळे यांच्या पाठपुराव्याची दखल घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची गंभीर दखल घेत तात्काळ ओमप्रकाश शेटे यांना डोंगरे कुटुंबाच्या सांत्वनपर भेटीसाठी पाठवले आणि मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.

**डोंगरेवाडीत सांत्वनपर भेट;**

दि.६ जानेवारी २०२६ रोजी ओमप्रकाश शेटे यांनी डोंगरेवाडी येथे जाऊन गणेश डोंगरे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांचा सांत्वनपर संदेश पोहोचवला आणि ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली. शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असा विश्वास त्यांनी यावेळी डोंगरे यांच्या आई-वडिलांना आणि पत्नीला दिला. यावेळी वडवणी तहसील चे तहसीलदार महिंद्रकार, दिनकरराव आंधळे, भाजप युवा मोर्चाचे बीड जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, सरपंच मयूर आंधळे, बंडू खांडेकर, भगवान कांदे, ऋषी खोटे, सरपंच सोन्नाखोटा, श्रीमंत मुंडे, उतरेश्वर खताळ सरपंच कान्हापूर, गणेश जायभाये सह परिसरातील व डोंगरेवाडी चे ग्रामस्थ उपस्थित होते.

# शहरातील वातावरण बदलाने सर्दी-खोकल्याचे रुग्ण वाढले

**कन्नड । प्रतिनिधी**

कन्नड गेल्या काही दिवसापासून वातावरणात लक्षणीय बदल होत असून सकाळ संध्याकाळ गारवा दुपारी उष्णता आणि अचानक वाढलेली आद्रता यामुळे सर्दी खोकला घसा खवखवणे ताप व अंगदुखीचे रुग्ण वाढताना दिसत आहेत शासकीय व खाजगी रुग्णालय ग्रामीण दवाखाने तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र मध्ये असे तक्रारी घेऊन येणाऱ्या मुलांची संख्या वाढली आहे. रात्रीचे तापमान घटत असताना दुपारच्या वेळी कडक ऊन जाणवत आहे.

तापमानातील चढउताराचा थेट परिणाम लहान मुले व वृद्ध नागरिक व आधीपासून आजार असलेल्या रुग्णावर होत असल्याचे वैद्यकीय तज्ञ सांगतात. अनेक रुग्णांना कोरडा खोकला नाक वाहने डोकेदुखी थकवा अशी लक्षणे दिसून येत असून काही ठिकाणी वायरल तापाची रुग्ने आढळत आहेत. सरस्व ग्रामीण भागातील आवश्यक दुकानांमध्ये सर्दी खोकल्यावरील औषधांची मागणी वाढली आहे. विशेष शाळकरी मुले आणि कामानिमित्त घराबाहेर पडणारे नागरिक या आजाराला अधिक बळी पडत असल्याचे चित्र आहे बदलत्या हवामानामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमी



होत असल्याने संसर्ग लवकर पसरतो असे डॉक्टरचे मत आहे.

दरम्यान आरोग्य विभागणी नागरिकांना ताप किंवा खोकला वाढल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा स्वतःहून औषधे घेणे टाळेवासी आव्हान करण्यात आले आहे. हवामानातील पुढील काही दिवसांचा चढउता राहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क आणि गरजेचे आहे. योग्य काळजी व वेळेवर उपचार घेतल्यास सर्दी खोकल्यापासून बचाव करता येईल असे आरोग्य तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. थंड उष्णतेतील अचानक बदल टाळावेत सकाळ संध्याकाळ गरम कपडे वापरावेत पुरेसे पाणी प्यावे घराबाहेर पडताना मास्कचा वापर करावा तसेच खोकताना शिंकताना स्वच्छतेची काळजी घ्यावी असे सुचित करण्यात आले आहे.

## लोकशाही पत्रकार संघ व सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशन च्या वतीने

# महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील अनेक संपादक व समाजसेवक यांना लोकरत्न पुरस्काराने केले सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथे बार्शी रोडवरील असलेल्या श्री सोमेश्वर मंदिर या ठिकाणी बाळ शास्त्री जांभेकर यांच्या दर्पण दिनानिमित्त लोकशाही पत्रकार संघ सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन यांच्या वतीने महाराष्ट्रासह मराठवाड्यातील तसेच बीड जिल्ह्यातील संपादक पत्रकार समाजसेवक यांना लोक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा अधिकारी विवेक जॉनसन साहेब तसेच अध्यक्ष म्हणून बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेब तसेच उपस्थितीमध्ये प्रमुख उपस्थिती जतीन रहेमान तसेच नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश फडके व बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, डॉक्टर घोडके, पाली महसूल विभागाच्या मंडळ निरीक्षक लेडी दबंग सिंघम शितल ताई व समाजसेविका मयुरी बांगर समाजसेविका सीमा ओस्तवाल यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



यावेळी सर्व उपस्थित यांचे सोमेश्वर मंदिर महादेव मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष तथा लोकशाही पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी सर्वांना सन्मानपत्र देऊन सर्व पत्रकारांच्या व समाजसेवकांच्या उत्कृष्ट कार्याचा गौरव केला व त्यांना पुढील कार्यास भरभरून दिल्या. मंदिर समितीच्या वतीनेव पत्रकार संघाचे वतीने शुभेच्छा दिल्या. यावेळी येथे उपस्थित असलेले संपादक गंगाधर नाना काळकुटे व लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य तसेच नाशिक येथून या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले धर्मेंद्र कदम, जयश्रीताई मस्के लोकशाही पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष प्रतापराव साळुंखे पाटील सिल्लोड येथील उपस्थित असलेल्या नीलफोर शेख मॅडम, वसीम आझाद अनिश कुरेशी, संपादक घाडगे मॅडम, संपादक संदीप बेद्रे, लोकशाचे पत्रकार अभिजीत नखाते, मराठवाडा नेता दत्तात्रेय नरनाळे, आत्माराम वाहळकर, माजी नगरसेवक बाबुराव परळकर, अलकाबाई डावकर, ॲड. गोविंद शिराळे, डॉक्टर उर्मिला घोडके, प्रेस फोटोग्राफर कृष्णा शिंदे, अविनाश कुलकर्णी, संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर, पत्रकार दैनिक न्याय टाइम्स तसेच पत्रकार किशोर कुलकर्णी, पत्रकार प्रकाश गाडे, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, गोरख मुंडे व जयश्री माने मॅडम व लोकशाही पत्रकार संघाच्या आरोग्य समिती बीड जिल्हा मार्गदर्शिका व डॉक्टर राजकन्या मुंडे मॅडम तसेच लोकशाही पत्रकार संघाच्या बीड जिल्हा आरोग्य समिती सल्लागार रोशनी शिंदे मॅडम, साक्षी सोनवणे मॅडम, तेजस्विनी दहिफळे मॅडम, जयश्री बस्ते मॅडम, लोकशाही पत्रकार संघाच्या पिंपळनेर सर्कलच्या मनीषा देवडकर मॅडम, आष्टी येथील पत्रकार अण्णासाहेब साबळे, बीड जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर तांदळे, राजु अंडागळे, संपादक लक्ष्मण गायकवाड, पत्रकार नितीन जोगदंड गायकवाड, दत्ता बनकर, संपादक साप्ताहिक समीकरण वार्ताच्या मुख्य संपादिका शारदाताई डूलगच व सविता जैन मॅडम, इमानदार पत्रकार तसेच महाराष्ट्र मराठवाड्यातील व बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार समाजसेवक या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांनी आपापला सन्मान स्वीकारून आयोजकाचे या ठिकाणी केलेल्या उत्कृष्ट कार्याचे कौतुक केले. फॉरेस्ट ऑफिसच्या ससाने यांचा देखील सन्मानपत्र देऊन त्या सध्या वन विभागाच्या उत्कृष्ट कार्याच्या बाबतीत करत असलेल्या कार्याबद्दल सर्वांनी समाधान व्यक्त करून त्यांनाही सन्मानपत्र दिले तसेच या कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे सूत्रसंचालन लोकशाही पत्रकार संघाचे मराठवाडा विभागाचे अध्यक्ष आत्माराम जी वावळकर सर यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे व सर्व पत्रकारांचे सर्वांचे त्यांनी मन जिंकले. आपल्या मंजुळ अशा गोड अशा आवाजाने सर्वांचे मन जिंकले व हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि आनंदाच्या वातावरणामध्ये सोमेश्वर महादेव मंदिर फाउंडेशन या ठिकाणी संपन्न झाला. जिव्हाळा या ठिकाणी असलेल्या अनाथ आई-वडिलांच्या आई वडिलांच्या जीवाची काळजी घेणाऱ्या छायाताई सर्व दे तसेच राजू जोगदंड अभिजीत वैद्य साहेब यांच्या देखील फाउंडेशनच्या पत्रकार संघाच्या वतीने सन्मानपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.



# कल्याण तालुका पोलीस ठाणे आणि जिल्हा परिषदेतर्फे पत्रकार दिनी संजय कांबळे यांचा सन्मान!

**कल्याण । प्रतिनिधी**

मराठी पत्रकारीतेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जंयती निमित्त अर्थात ६ जानेवारी या पत्रकार दिनानिमित्त जेष्ठ पत्रकार तथा मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचे सदस्य संजय कांबळे यांचा सन्मान कल्याण तालुका पोलीस ठाणे व ठाणे जिल्हा परिषदेच्या कल्याण पंचायत समितीच्या वतीने नुकताच करण्यात आला, व शुभेच्छा दिल्या.

रत्नागिरी (सिंधुदुर्ग) जिल्ह्यातील पोंभुर्ले येथे जन्मलेल्या बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म दिवस म्हणजेच ६जानेवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. ६जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण, हे पहिले वृत्तपत्र सुरू केले. आचार्य जांभेकर हे विद्वान, शिक्षणतज्ज्ञ आणि समाजसुधारक होते, त्यांनी दर्पण आणि दिग्दर्शन मधून समाजप्रबोधन, अंधश्रद्धा निर्मूलन व स्त्री शिक्षणावर लिखाण केले. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रात नवयुगाची सुरुवात झाली. तेंव्हा पासून महाराष्ट्रात त्यांचा जन्मदिवस पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. याच दिनाचे औचित्य साधून कल्याण तालुका पोलीस ठाण्यात डिवाय एसपी अनिल लाड यांच्या हस्ते आणि तालुका पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक पंकज गिरी यांच्या उपस्थितीत शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते जगण संते, चेतन लगड, राजेंद्र सैनी, कु आंन्शू व हिंमाशू कांबळे उपस्थित होते. तर कल्याण पंचायत समिती मध्ये गटविकास अधिकारी रघुनाथ गवारी, यांनी श्री कांबळे यांचा पत्रकार दिनानिमित्त सत्कार केला, यावेळी कृषी अधिकारी एस एस संत, विस्तार अधिकारी सुभाष अहिर, म्हारळचे शिवसेना शहरप्रमुख निलेश देशमुख, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश कोंगिरे, अँड, निलेश पवार आदी मंडळी उपस्थित होते.

तसेच आजच्या पत्रकार दिनानिमित्त ठाणे जिल्हा परिषदेचे प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे मँडम, डेप्युटी सीईओ अविनाश फडतरे, रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष राजेश घणगाव, श्रमजीवी संघटनेचे जिल्हा सचिव दशरथ भालके, इत्यादी सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. या सर्वांचे पत्रकार कांबळे यांनी आभार मानले.

## आमदार प्रकाशदादा सोळंके अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बालासाहेब जाधव यांची प्रमुख उपस्थिती

# दर्पण दिनानिमित्त किल्ले धारूर येथे पत्रकारांचा गौरव

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

दर्पण दिन अर्थात पत्रकार दिनानिमित्त किल्ले धारूर येथे पत्रकारांचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. आमदार प्रकाशदादा सोळंके हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून नवनिर्वाचित नगराध्यक्ष मा. बालासाहेब रामराव जाधव उपस्थित होते. या वेळी समाजातील लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकार बांधवांचा यथोचित गौरव करण्यात आला. पत्रकार हे समाजप्रबोधनाचे कार्य करीत असून, जनतेच्या समस्या शासन दरबारी मांडण्याचे महत्त्वपूर्ण काम करीत आहेत. पत्रकारांच्या योगदानामुळेच लोकशाही अधिक सक्षम होत असल्याचे मत आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले.

नगराध्यक्ष बालासाहेब जाधव यांनी आपल्या भाषणात किल्ले धारूर शहरातील नागरिकांच्या विविध समस्या व अडचणींबाबत सकारात्मक भूमिका मांडली. रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा तसेच पाणी टंचाईसारख्या गंभीर प्रश्नांवर ठोस निर्णय घेऊन नागरिकांना लवकरात लवकर दिलासा देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी आवश्यक ती दक्षता घेतली जात असून, येत्या दोन ते तीन दिवसांत नागरिकांना नियमित पाणीपुरवठा मिळेल, यासाठी प्रशासनाकडून प्रभावी पावले उचलण्यात येत असल्याची ग्वाही त्यांनी दिली.



यावेळी आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी पत्रकारांसाठी स्वतंत्र पत्रकार भवन उभारणीसाठी आवश्यक निधी लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट आश्वासन दिले. तसेच धारूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी व नागरिकांच्या मूलभूत समस्यांवर ठोस उपाययोजना करण्यासाठी मजबूत पाया रचण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार बांधव, नगरसेवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले.

# पत्रकारांनी सामाजिक बांधिलकी जपावी : बी.आर. पांचाळ

## वार्डाचे काम निस्वार्थ पद्धतीने करणार : नगरसेवक दिलीप सोनवडे

**भोकर । प्रतिनिधी**

भोकर मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या दर्पण मराठी वृत्तपत्र पत्रकार दिन भोकर मध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. ६ जानेवारी १८३२ रोजी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी पहिले वृत्तपत्र सुरू केले त्यानिमित्त पत्रकार दिन साजरा केला जातो भोकर येथे ६ जानेवारी २०२६ रोजी विश्राम ग्रहावर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष बी.आर.पांचाळ हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, सभापती जगदीश पा.भोसीकर पोलीस निरीक्षक अजित कुंभार, संचालक रामचंद्र मुसळे राजेश अंगरवार, नगरसेवक दिलीप सोनवडे, स.पो.नी शैलेश औटी आदींची उपस्थिती होती. प्रारंभी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले, प्रास्तविकात ज्येष्ठ पत्रकार बालाजी नारलेवाड यांनी केले. नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, सभापती जगदीश पाटील, पो.नी अजित कुंभार, संचालक रामचंद्र मुसळे, संपादक उत्तम बाबळे, डॉ. मनोज गीमेकर, वंचितचे तालुका अध्यक्ष दिलीपराव यांनी भोकर शहरातील पत्रकारिता अत्यंत चांगली असून सत्य लिखाण करावे असे मनोगत मांडले अध्यक्षीय समारोपात बी.आर.पांचाळ यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी वृत्तपत्र पत्रकारितेचा पाया रचला असून सामाजिक लिखाण केले लोकमान्य टिळक, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अनंत भालेराव आदींनी सामाजिक पत्रकारितेचा वारसा चालवला अशाच प्रकारे सामाजिक भान ठेवून आजच्या पत्रकारांनी लिखाण करावे, असे आवाहन केले.



नगराध्यक्ष भगवानराव दंडवे यांच्या वतीने उपस्थित पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. व्हाईस ऑफ मीडियाच्या वतीने तालुका अध्यक्ष अंकुश रतनवार,माजी तालुकाध्यक्ष दत्ता बोईनवाड अनिल डोईफोडे यांच्या वतीने सर्व पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार एल.ए.हिरे, बाबुराव पाटील, श्रीकांत देव, मनोजसिंह चौहाण, सिद्धार्थ जाधव, जयभीम पाटील, लतीफ शेख, म.रा.पत्रकार संघटनेचे ता.अ. विजय चिंतावर, कमलाकर बरकमकर, सुधांशु कांबळे, लतीफ शेख यांच्यासह सर्व पत्रकार उपस्थित होते. सूत्रसंचालन ता. अध्यक्ष राजेश वाघमारे यांनी केले तर आभार बी.एस. सरोदे यांनी मानले.

# ठाण्यातील महिला निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची यांची तात्काळ बदली करा : ठाकरे शिवसेना



**ठाणे । प्रतिनिधी**

ठाण्यातील दोन महिला निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची यांची तात्काळ बदली करण्याची ठाकरे शिवसेनेने केली आहे. श्रीमती. वृषाली पाटील या ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी प्रभाग क्र १६, १७, १८ च्या निवडणूक निर्णय अधिकारी आहेत. त्यांची एकूणच कार्यपद्धती संशयास्पद असून सत्तारूढ पक्षास अनुकूल अशी आहे. अनेक उमेदवारांचे उमेदवारी अर्ज छाननीच्या वेळेस बेकायदेशीर व बेजबाबदारपणे त्यांनी अवैध ठरविलेले आहेत. तसेच श्रीमती. सत्वशीला शिंदे या ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी प्रभाग क्र ४, ५, ७ च्या निवडणूक निर्णय अधिकारी आहेत. त्यांची कार्यपद्धती संशयास्पद असून सत्तारूढ पक्षास अनुकूल अशी आहे. अनेक उमेदवारांचे उमेदवारी अर्ज छाननीच्या वेळेस बेकायदेशीर व बेजबाबदारपणे त्यांनी अवैध ठरविलेले आहेत.

उदा.- शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रभाग क्र. ५ अ च्या उमेदवार सौ. दीप्ती दिनेश जाबर यांचा उमेदवारी अर्ज कपट-कारस्तान करून अवैध ठरवला. व सत्ताधारी पक्षाच्या श्रीमती. सुलेखा चव्हाण यांना बिनविरोध निवडून येण्याचा मार्ग मोकळा केला. यामागे मोठे षड्यंत्र असून त्याला श्रीमती शिंदे पूर्णपणे जबाबदार आहे असे ठाकरे शिवसेनेने निवेदनात उल्लेख केला आहे.

परिणामी श्रीमती. वृषाली पाटील व श्रीमती. सत्वशीला शिंदे यांना अनुक्रमे प्रभाग क्र. १६, १७, १८ व प्रभाग क्र. ४, ५, ७ येथील जबाबदारीतून मुक्त करावे. व त्यांच्या कार्य पद्धतीची सखोल चौकशी करून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची ठाणे महापालिका आयुक्त सौरव राव यांना ठाकरे शिवसेनेने केली असून प्रसंगी मा. खासदार राजन विचारे, केदार दिघे उपस्थित होते.

# कळंब येथे पत्रकार दिन उत्साहात साजरा

**कळंब । प्रतिनिधी**

धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथे बाळशास्त्री जांभेकर व पत्रकार दिनाचे औचित्य साधून कळंब तालुका पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार भवन कळंब येथे नगराध्यक्षा सुनंदाताई शिवाजी कापसे, नगरसेवक शितल चोंदे व कळंब तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार हेमंत ढोकले यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर व शिवशंकर (बप्पा घोंगडे) यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच पत्रकारांना शुभेच्छा म्हणून मान्यवरांच्या हस्ते पेन बॉक्सचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला कळंब तालुका पत्रकार संघाचे विश्वस्त सतीश टोणगे, अध्यक्ष अशोक शिंदे, पत्रकार अमर चोंदे, बालाजी अडसूळ, प्रदीप यादव, अनिल गाडे, शिवप्रसाद बियाणी, शितल घोंगडे, ओमकार कुलकर्णी, सचिन माळी, परवेज मुल्ला आदी कळंब तालुक्यातील पत्रकार हजर होते.




# मुख्याध्यापक कोथिंबीरे सह दोन शिक्षक जिल्हा शिक्षक पुरस्काराने सन्मानित

## उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या हस्ते करण्यात आला गौरव

**मस्साजोग । प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून गुणवंत विद्यार्थी घडवणार्या केज तालुक्यातील मस्साजोग येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापकसह दोन शिक्षकांचा दि.१ जानेवारी रोजी जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव करण्यात आला. हा पुरस्कार सोहळा बीड शहरातील संभाजी महाराज क्रीडा संकुलात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार बजरंग सोनवणे, आमदार सुरेश धस, आमदार विक्रम काळे, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान यांच्यासह अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.



यावेळी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मुख्याध्यापक रंगनाथ कोथिंबीरे, शिक्षक प्रशांत जाधव, पुष्पा बनसोडे यांना जिल्हा प्रशासनाकडून शिक्षक म्हणून शैक्षणिक सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावून, निपूण महाराष्ट्र अंतर्गत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यात मोलाचे योगदान दिले आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे कार्य, निष्ठा, मेहनत व कर्तृत्व लक्षात घेता त्यांना सन २०२४ जिल्हा शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे. असे आशयाचे कौतुकाची पावती असलेली सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्याबद्दल मस्साजोग जि.प शाळेतील पुरस्कार्थी असलेल्या सर्व शिक्षकांचे सरपंच वर्षा आनंद सोनवणे, धनंजय देशमुख, अध्यक्ष श्रीकांत सोनवणे, पत्रकार अनंत जाधव यांच्यासह सर्व शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि सर्व शिक्षक वृंध, मित्रपरिवाराकडून आणि नातेवाईकांकडून कौतुक होत आहे.

शासनाने माझ्या कार्याची दखल घेऊन केलेला सन्मान माझ्यासाठी खूप मोलाचा व प्रेरणादायी आहे. माझ्या ज्ञानदानाचे हे कार्य मी अविरतपणे आणि उत्स्फूर्तपणे असेच करत राहील. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये रंग व कलेच्या माध्यमातून भर घालत राहीन.

**प्रशांत जाधव, शिक्षक**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो जाळणाऱ्यांवर देशद्रोहाची कारवाई करा

**पुरोगामी महाराष्ट्रासाठी संघटनांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

**जिंतूर । प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो जाळण्याची घृणास्पद व देशद्रोही घटना घडल्याच्या निषेधार्थ पुरोगामी महाराष्ट्रासाठी या सामाजिक व पुरोगामी विचारसरणीच्या संघटनांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व गृहमंत्री यांच्याकडे तीव्र निषेध नोंदवत कठोर कारवाईची मागणी केली आहे. यासंदर्भात तहसीलदार जिंतूर यांच्यामार्फत राज्य सरकारला निवेदन सादर करण्यात आले आहे. मध्यप्रदेशातील ग्वाल्हेर येथे अनिल मिश्रा व त्याच्या टोळीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो जाळल्याची घटना समोर आली असून, ही कृती अत्यंत घृणास्पद, समाजद्रोही व देशद्रोही असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ही घटना केवळ एका महापुरुषाचा अपमान नसून भारतीय संविधान, सामाजिक समता, बंधुता व लोकशाही मूल्यांवर केलेला थेट हल्ला असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, यापूर्वीही संबंधित व्यक्तींनी महापुरुषांच्या पुतळ्यांचा विरोध करणे, समाजात तेढ निर्माण करणे व सतत चिथावणीखोर कृती करणे असे प्रकार केले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो जाळण्याची घटना देशातील शांतता व सामाजिक सलोखा बिघडवणारी असून, अशा कृत्यांमुळे गंभीर परिणाम होऊ शकतात.

सदर फोटो जाणूनबुजून सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आल्याने महामानवांच्या अनुयायांची भावना दुखावली असून, -ख व डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भविष्यात अशा प्रतिमांचा विकृत व धोकादायक वापर होण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे. सदर कृत्य करणाऱ्या अनिल मिश्रा व त्याच्या टोळीला देशद्रोही घोषित करण्यात यावे. संबंधित आरोपींवर ण-झ- सारख्या कठोर कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करून तात्काळ अटक व खटला चालवावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच इतर महापुरुषांच्या प्रतिमा जाळणे, विटंबना करणे किंवा अवमान करणाऱ्यांसाठी इछड अंतर्गत स्वतंत्र व कठोर कायद्याची तरतूद करण्यात यावी. अशा समाजद्रोही प्रवृत्तींविरोधात राज्य व केंद्र सरकारने स्पष्ट व कठोर भूमिका जाहीर करावी. देशातील शांतता व सामाजिक एकोपा बिघडवणाऱ्या कृत्यांवर 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोट्यवधी भारतीयांचे प्रेरणास्थान असून त्यांच्या विचारांवरच आजचा भारत उभा आहे. त्यांच्या प्रतिमेची विटंबना कदापि सहन केली जाणार नाही, अशी भूमिका संघटनांनी घेतली आहे. शासनाने तात्काळ कठोर कारवाई न केल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.



# १५ जानेवारीला सार्वजनिक सुट्टी सरकारचा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने बीएमसी निवडणूक आणि इतर २९ महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुढील गुरुवार, १५ जानेवारी २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. ही सुट्टी मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यांसह २९ महानगरपालिका क्षेत्रांना लागू असेल.

मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी ही सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. राज्य सरकारने यापूर्वी जाहीर केलेल्या ही सुट्टी २०२६ च्या २४ सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये समाविष्ट नव्हती. ही सार्वजनिक सुट्टी केवळ संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक कार्यक्षेत्रासाठी लागू असेल असे एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.



**मतदानाची वेळ–वार काय?**

या सुट्टीमुळे मुंबईतील शेअर बाजार बंद राहण्याची शक्यता आहे. मात्र रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. तसेच मुंबईसाठीच्या आरबीआयच्या सुट्ट्यांच्या यादीत १५ जानेवारीचा समावेश नाही. पुढील गुरुवार १५ जानेवारी रोजी सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. सर्व मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे.

**खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांबाबत काय निर्णय?**

खाजगी क्षेत्रातील नोकरदारांच्या सुट्टीबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. संबंधित संस्थांना आपल्या कर्मचाऱ्यांना सुट्टी द्यायची की नाही, हे घेण्याचा अधिकार आहे. काही संस्था आपल्या कर्मचाऱ्यांना मतदानासाठी सकाळी किंवा संध्याकाळी दोन तास सूट देण्याचा निर्णय घेऊ शकतात.

**१६ जानेवारी रोजी निकाल**

राज्य निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील २९ महापालिकांच्या निवडणुका १५ जानेवारी रोजी एकाच टप्प्यात घेण्याची घोषणा केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (इचउ) निवडणुकीचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर केला जाईल. आशियातील सर्वात मोठी नागरी संस्था असलेल्या बीएमसीसाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक ७४,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.

**मुंबई महापालिकेत किती मतदार?**

बीएमसी निवडणुकीत एकूण १,०३,४४,३१५ मतदार मतदानाचा हक्क बजावतील. यामध्ये ५५,१६,७०७ पुरुष मतदार, ४८,२६,५०९ महिला मतदार आणि १,०९९ इतर मतदारांचा समावेश आहे. २०१७ च्या निवडणुकीत अखंड शिवसेनेने ८४ जागा जिंकल्या होत्या.

# सफाई कामगारांना अरेरावी कराल तर खबरदार जशास तसे उत्तर देऊ : ॲड.जोगदंड

**बीड । प्रतिनिधी**

जानेवारी बीड शहरातील स्वच्छतासाठी नगर परिषदेतील सफाई कामगार पहाटे थंडीत नेमून दिलेल्या ठिकाणी स्वच्छतेची कामे करतात एखाद दुसरा कामगार कामात कसूर करत ही असेल परंतु सर सकट सफाई कामगारांना नाहक दोष देणे योग्य नसून निवडणुकीचा राग मनात धरून जर का बौद्ध, मातंग, चर्मकार, वाल्मिक समाजातील सफाई कामगारांना सत्ताधारी पक्षातील कुठला ही नगरसेवक किंवा पदाधिकारी पदाचा रुबाब दाखवत अरेरावी करत असेल तर जशास तसे उत्तर देऊ असा इशारा भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक/अध्यक्ष तथा माजी नगरसेवक ॲड विकास जोगदंड यांचे सह ॲड.मिलिंद वाघमारे, विष्णू गायकवाड, राजेशभाई कोकाटे, लखन शिंदे, महादेव वंजारे आदींनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून दिला आहे.



नगर परिषद ही कुणाची खाजगी मालमत्ता अथवा मक्तेदारी नाही. शहराच्या हितासाठी बिलकुल आपण आपल्या पदाचा सदउपयोग करा परंतु विनाकारण कुणाला त्रास देण्याचा प्रयत्न करत असाल अन्याय करत असाल तर मात्र आम्ही रस्त्यावर उतरु असे ही शेवटी माजी नगरसेवक ॲड विकास जोगदंड यांनी पत्रकातून सांगितले आहे.

# जातीय द्वेषातून रा.प. अधिकाऱ्याकडून सातत्याने छळ

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बीड आगारात कार्यरत असलेले वाहतूक निरीक्षक भिमकिरण विनायक बनसोडे यांनी वरिष्ठ अधिकारी निलेश पवार यांच्यावर जातीय भावनेतून मानसिक, प्रशासकीय व वैयक्तिक छळ केल्याचा गंभीर तक्रार करत रा.प.प्रशासनाकडुन न्याय देण्यात यावा मागणी केली आहे. मागासवर्गीय समाजातील असल्यामुळेच आपल्यावर अन्याय केला जात असल्याचा थेट तक्रार त्यांनी केली आहे.

बनसोडे हे मागील दोन वर्षांपासून बीड आगारात प्रामाणिकपणे सेवा बजावत असताना, सन २०२२-२३ या कालावधीत तत्कालीन आगार व्यवस्थापक निलेश पवार यांनी जाणीवपूर्वक खराब सी.आर. लिहून बढती रोखण्याचा प्रयत्न केला, अशी तक्रार त्यांनी केली. सहाय्यक वाहतूक अधिक्षक पदाची परीक्षा उत्तीर्ण होऊन आणि प्रतिक्षा यादीत नाव असतानाही जातीय आकसातून बढतीपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न वरीष्ठ अधिकारी श्री निलेश पवार करीत आहेत. यानंतर निलेश पवार यांची बदली विभागीय कार्यशाळेत ओ.एम.ई. म्हणून झाली. मात्र तेथे असतानाही त्यांना कर्मचारी वर्ग अधिकारी (डीपीओ) पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आणि त्या अधिकाराचा गैरवापर करून बनसोडे यांची बीड आगारातून धारूर आगारात नियमबाह्य बदली करण्यात आली, होती. तेव्हापासून सतत मानसिक व प्रशासकीय त्रास देण्याचे प्रकार सुरू असल्याचे माहिती मिळते



दरम्यान, दि. ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी कुमशी (शाळा) कर्तव्यावर असलेल्या बसला मागून कारची धडक बसली होती. या घटनेत बसचे किरकोळ नुकसान झाले असून नुकसानभरपाई ५ हजार रुपये संबंधित वाहन मालकाकडून तात्काळ वसूल करून बस दुरुस्त करण्यात आली. त्याच दिवशी बस पुन्हा मार्गावर सोडण्यात आली व तब्बल दोन महिन्यांहून अधिक काळ ती नियमितपणे चालू होती.मात्र, दोन महिन्यांनंतर सहाय्यक यंत्र अभियंता निलेश पवार यांनी जाणीवपूर्वक सदरील बस विभागीय कार्यशाळेत बोलावून खोटा पंचनामा तयार केला व खोटा अहवाल सादर करून बनसोडे यांच्यावर चौकशी लादली आहे. नुकसानभरपाई नियमानुसार भरली असतानाही केवळ आपण मागासवर्गीय असल्यामुळेच आपल्याला लक्ष्य केले जात असल्याचा तक्रार बनसोडे यांनी केला. एकीकडे सी.आर. खराब करणे, दुसरीकडे नियमबाह्य बदली आणि आता खोटी चौकशी – हा सर्व प्रकार जातीय द्वेषातून आणि सूडभावनेतून केला जात आहे, असा ठपका त्यांनी ठेवला आहे. या संपूर्ण प्रकरणाची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करून आपल्याला नैसर्गिक न्याय द्यावा, तसेच जातीय भावनेतून छळ करणार्या निलेश पवार यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम मागणी वाहतूक निरीक्षक भिमकिरण विनायक बनसोडे यांनी व्यवस्थापकीय संचालक तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्याकडे केली आहे.




# डूब्बा मजरा ग्रा.पं.चे सरपंच आसाराम क्षीरसागर यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार

**बीड । प्रतिनिधी**

सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात डुबा मजरा) ग्रुप ग्रामपंचायत येथील सरपंच आसाराम क्षीरसागर यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पंचायत राज व्यवस्थेत केलेले उल्लेखनीय कार्य, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी राबवलेले उपक्रम व पारदर्शक कारभार याची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला. मान्यवरांच्या उपस्थितीत क्षीरसागर यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. या पुरस्कारामुळे डुबा मजरा ग्रामपंचायत चा गौरव वाढला असून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या परळी तालुका व शहर पत्रकार संघाच्या वतीने दै. जगमित्र कार्यालयात दर्पणदिन उत्साहात साजरा

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी तालुका व शहर पत्रकार संघाच्या वतिने दै. जगमित्रचे मुख्य संपादक बालासाहेब कडबाने यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली दर्पण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी परळी शहरातील जो थंडी आसो की पाऊस आश्या वातावरणात भल्या पहाटपासुन वृतपत्र वितरक वितरणा साठी जिवाचे रान करतात आश्या वितरकांचा बाळासाहेब काटे, रामेश्वर पोळ, बाळु जोशी, उमाकांत खरबड, गवळी आदिंचा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मा. शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या शुभहस्ते सत्कार करून त्यांचा सन्मान केला गेला.

त्याच वेळी परळी शहरातील बेवारस सापडलेल्या मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कारापर्यंत जे पोलिसांच्या मदतीला रात्री बे रात्री धावुन जातात असे शिवाजी लांडगे यांचा ही विषेष सत्कार करण्यात आला.



यावेळी बोलतांना वृतपत्र वितरकांसाठी जमिनचे हस्तांतर करून नपच्या माध्यमातुन घरकुल बांधुन देण्याचे बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी आश्वासन दिले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे शिवसेना, मा. उपनगराध्यक्ष आभय कुमार ठक्कर, प्रा. आतुल दुबे सर, दै. परळी प्रहारचे राजेश साबणे, शिवसेनेचे रमेश चौंडे मनोज संकाये यांची उपस्थिती होती तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परळी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रल्हाद कंडुकटले, शहराध्यक्ष रंगनाथ सावजी, कार्याध्यक्ष सुमित गिरी, सचिव मोहन चव्हाण, नितीन जाधव याच्यासह पत्रकार संघाचे सदस्य मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. आभार प्रदर्शन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रल्हाद कंडुकटले यांनी केले.

# खादमीन-ए-उम्मत संस्थेच्या वतीने 'आफताब-ए-सहाफत' विभागीय पुरस्कारासाठी ॲड.इकबाल शेख यांची निवड

**लातूर । प्रतिनिधी**

साहित्यिक, स्तंभलेखक, कवी, पत्रकार तसेच विधिज्ञ ॲड.इकबाल रसूलसाब शेख यांना नांदेड येथील खादमीन-ए-उम्मत या स्वयंसेवी संघटनेतर्फे जाहीर करण्यात आलेला 'आफताब-ए-सहाफत' (पत्रकारितेचा सूर्य) विभागीय पत्रकारिता पुरस्कार येत्या १८ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे एका विशेष समारंभात प्रदान केला जाणार आहे.

ॲड.इकबाल रसूलसाब शेख यांच्या कविता व लेखनाचे मराठी व हिंदी वृत्तपत्रांतून नियमित प्रकाशन होत असते. ते सा.लातूर रिपोर्टरचे कार्यकारी संपादक व स्तंभलेखक असून 'प्रश्नचिन्ह' व 'आँखों देखा हाल' या नावाने प्रसिद्ध होणारे त्यांचे स्तंभलेख वाचकप्रिय ठरले आहेत. गेल्या वीस वर्षांहून अधिक काळ ते मराठी व हिंदी पत्रकारितेत सक्रिय असून, सध्या ते विविध वर्तमानपत्रांमध्ये लेखन करीत आहेत.



पत्रकारितेसोबतच ते सामाजिक कार्यातही अग्रेसर असून, गेल्या २५ वर्षांपासून 'खिदमत-ए-खल्क' व 'सोशल वेल्फेअर सोसायटी' च्या माध्यमातून सामाजिक कार्यात सतत कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे मोलाचे योगदान असून, ऑर्बिट प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूल व राहत अकॅडमीच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण देण्याचे कार्य ते करीत आहेत. अनेक क्षेत्रांतील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत खादमीन-ए-उम्मत संस्थेने त्यांची या विभागीय पुरस्कारासाठी निवड केली आहे. 'आफताब-ए-सहाफत' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रांतून ड.इकबाल रसूलसाब शेख यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. दरम्यान, खादमीन-ए-उम्मत संस्थेचे अध्यक्ष आबेद खान हमीद खान यांच्या वतीने पुरस्कार निवडीचे पत्र अलहाज सलीम अलंद सर व अलहाज सय्यद म.सलीमोद्दीन करीमोद्दीन सर यांच्या हस्ते प्रदान करून ॲड.इकबाल रसूलसाब शेख यांना शुभेच्छा देण्यात आल्या. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर ॲड इक्बाल शेख यांचे सर्व स्तरातून शुभेच्छा व अभिनंदन करण्यात येत आहे.

# प्रबुद्ध समाज बनविण्यासाठी नीतीवान माणूस बनणे गरजेचे : प्रा.डॉ. मिलिंद आव्हाड

## महाविहार धम्मभूमी शिवणी येथे पौष पौर्णिमा व सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

महाविहार धम्मभूमी शिवणी येथे प्रत्येक पौर्णिमेनिमित्त धम्मदेशना कार्यक्रम आयोजित केला जातो. ह्या पौष पौर्णिमेदिनी धम्मदेशना व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले प्रा.डॉ. मिलिंद आव्हाड (जे एन यु दिल्ली तथा अध्यक्ष मानवी हक्क अभियान) आपल्या मनोगतात म्हणाले की प्रबुद्ध समाज बनण्यासाठी नीतिवान माणूस बनावे लागेल. सम्यक ज्ञानाने व पालनाने समाज धम्माशील बनू शकतो. माता रमाईचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर बद्दलचा जिव्हाळा, प्रेम जसे होते तसाच जिव्हाळा, प्रेम क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यामध्ये होता. या महान मानवाचे व मातेचे स्मरण सतत ठेवून आपल्या जीवनात शिक्षण हे नीतीवान माणूस घडण्यासाठी कसे महत्त्वाचे आहे हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वंचितांच्या, बहुजनांच्या व सर्व स्त्री-पुरुषांच्या शिक्षणाचे प्रणेते आहेत. तरी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे लक्षात ठेव स्व उधारा बरोबरच समाजाचे व देशाचे हित कसे साध्य करता येईल ह्याकरिता सतत प्रयत्नशील असली पाहिजे असे आग्रेपणे प्रतिपादन केले.



कार्यक्रमास उपस्थित असलेले पूज्य भंते धम्मशील थेरो पु. पय्यावर्धन पु भंते बुद्धबोधी यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध प्रतिमेस पुष्प व दीप धुपाने पूजन करून सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुष्पमाला मान्यवरांच्या हस्ते अर्पण करून अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक सेवानिवृत्त सीईओ पी.व्ही. बनसोडे यांनी केले. व आपल्या प्रास्ताविकात संस्थेच्या कार्याबद्दल माहिती देऊन पुढील नियोजनाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंकुश कोरडे यांनी केले. संस्थेस अमेरिकेमध्ये उच्च पदावर कार्य करणारे प्रतीक देविदास तांगडे यांच्या आई-वडिलांनी संस्थेला आर्थिक दान दिले. तसेच भोजनदान देणारे सखाराम उजगरे व खीरदान देणारे राहुल सोनवणे तसेच आदिती तुकाराम कांबळे एम.बी.बी.एस. ही वैद्यकीय पदवी मिळवणाऱ्याचा संस्थेतर्फे यथोचित सत्कार करण्यात आला.

पूज्य भिक्खु पय्यावर्धन आपल्या मुख्य धम्मदेशनेत म्हणाले की जगाला शांतीचा, समतेचा, संदेश देणारे व दुःखमुक्तीचा मार्ग दाखवणारे तथागत गौतम बुद्धांच्या जीवनात पौर्णिमेच्या दिवसाला अनन्य साधारण महत्व आहे. राजा बिंबीसाराने पौष पौर्णिमेला सम्यक संकल्प करून तथागतांना भिक्खु संघाकरिता वेळुवन दान केले होते. तरी तथागतांच्या उपदेशाप्रमाणे आपल्या जीवनात दानपारमीतेला उच्च स्थान देणे लक्षात घेऊन मानवाला, अति दुर्मिळ लाभलेले मानवी जीवन अरहंत पदाकडे वाटचाल करणे हे सर्वांच्या हिताचे आहे, अशी मोलाची धम्मदेशना देऊन वातावरण धम्ममय केले. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे व बहुसंख्य सदस्य, बीड शहरातील व परिसरातील बहुसंख्य उपासक उपासिकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सामाजिक कार्यकर्ते राजू जोगदंड यांनी व्यक्त केले. पूज्य भंते धम्मशील थेरो यांच्या आशीर्वाद गाथेने व शरणातयेणे कार्यक्रमाची सांगता झाली.

# मलकापूर येथे पत्रकार दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय दर्पण रत्न पुरस्काराने युवा कलाकार सुदाम मासाळ सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार दिनानिमित्त हिंदी मराठी पत्रकार संघा च्या वतीने आयोजित दर्पण रत्न राज्यस्तरीय पुरस्कार २०२६ कार्यक्रम मलकापूर येथील मराठा मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला सदर कार्यक्रमात महाराष्ट्राचे कानाकोपऱ्यातील आलेल्या विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सत्कार करण्यात आला. आंतरराष्ट्रीय मानांकन आयएसओ ९००१२०१५ प्रमाणित हिंदी मराठी पत्रकार संघाच्या वतीने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याच्या उद्देशाने व त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी दर्पण रत्न राज्यस्तरीय पुरस्कार २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमांमध्ये गेवराई तालुक्यातील मौजे ईटकुर येथील प्रतिभावंत युवा कलाकार सुदाम लिंबराज मासाळ यांना सन्मानित करण्यात आले.



या शानदार सोहळयात बीड जिल्ह्यातील मौजे ईटकुर येथील प्रतिभावंत युवा कलाकार सुदाम लिंबराज मासाळ यांना राज्याचे सहाय्यक माहिती आयुक्त निलेशजी तायडे यांच्या हस्ते सन्मानपत्र, स्मृती चिन्ह, शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्यातील वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना दर्पण रत्न पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आले. दर्पण रत्न पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निलेश तायडे सहाय्यक माहिती आयुक्त मंत्रालय मुंबई, कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.प्रा. अनिल खर्चे (प्राचार्य व्ही.बी. कोलते इंजीनियरिंग कॉलेज), तर प्रमुख पाहुणे अशांत भाई वानखेडे संस्थापक समतेचे निळे वादळ, धनश्रीताई काटीकर पाटील महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ, बंडूभाऊ चवरे उद्योजक, बाळासाहेब दामोदर उद्योजक, दामोदर शर्मा शेतकरी नेते, विजय डागा, बंडू चौधरी, सुभेदार दिनेश तायडे कारगिल योद्धा, चंद्रकांत वर्मा हे होते कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व प्रथम महिला संपादक तानुबाई बिरजे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

कार्यक्रमात पत्रकारिता, शिक्षण, सामाजिक, राजकीय, चित्रपट सृष्टीतील कलाकार, कला, वैद्यकीय, उद्योजक, क्रीडा अशा अनेकविध क्षेत्रातील कर्तुत्वान व्यक्तींचा सत्कार दर्पण रत्न पुरस्कार २०२६ देऊन करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी देशासाठी आपल्या प्राणाची परवा न करता देशसेवा करणाऱ्या तसेच कारगिल युद्धात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सुभेदार दिनेश तायडे माजी सैनिक यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल पाटील यांनी तर आभार प्रदर्शन श्रीकृष्ण तायडे यांनी केले. ईटकुर येथील युवा कलाकार सुदाम मासाळ यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल महा एनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी सत्कार करुन शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच सुदाम मासाळ यांच्यावर मित्र परिवारासह मान्यवर मंडळींचा शुभेच्छांचा वर्षाव सुरू झाला आहे.

दैनिक, **प्रवक्ता लोकशाहीचा** हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **मुजमुले नितीन रावण** यांनी मुद्रक,जगमित्र ऑफसेट,बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै, ता,परळी वै,जि,बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून दैनिक प्रवक्ता लोकशाहीचा कार्यालय, जाधव बिल्डिंग केसके रोड मित्र नगर चौक बीड, ता, जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील) मो,९६७३२१०४३८ - ई-मेल- pravaktalokshahichagmail.com

The Daily newspaper, Pravakta Lokshahicha, is published by its publisher, owner, and editor, Mujmule Neetin Rawan. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Pravakta Lokshahicha Daily office, Jadhav Belding Ksk Road mitra nagar chauk Beed, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news published in the Daily. The responsibility for selecting the content rests with them as per the PRB Act.) Mobile: 9673210438 - Email: pravaktalokshahicha@gmail.com